## Creation of a Computer Centre for Training@

## प्रशिक्षणासाठी संगणक केंद्राची सुरुवात

अक्षरशः केवळ काही लाख रुपयांत संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्याने मुख्य कार्यालयापासून कॉलेज मधील सर्व कर्मचाऱ्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला होता. सर्वांसाठी असं काहीही घडणं खूप अनपेक्षित होतं कारण त्या काळात संगणक प्रशिक्षण केंद्र उघडण्यासाठी दहा पंधरा लाखांच्यावरच खर्च येत असे नुसता बांधकामाचाच खर्च मुळी पाच एक लाखांच्या वर सहज जात असे.

**घटनेची पार्श्वभूमी**

ही १९८४ सालातली घटना आहे. त्याकाळात संगणकाचा वापर केवळ मोठ्या उद्योगधंद्यामध्ये किंवा अग्रगण्य शिक्षण संस्थांपुरताच सीमित होता. सर्वसाधारणपणे अशा ठिकाणी मेनफ्रेम संगणक विशेषतत्वाने वापरले जात असत पण त्याच बरोबरीने छोटे संगणक सुद्धा हळूहळू वापरात येऊ लागले होते. बँकांच्या दैनंदिन कामकाजामध्ये संगणकाचा वापर सुरु करावा ह्या उद्देशाने इंडियन बँक असोसिएशन आणि बँकांमधील वेगवेगळ्या युनियन्स ह्यांच्यात करार करण्यात आले होते. मुख्य कार्यालयातून बँकेच्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेजला एक पत्र धाडण्यात आले त्यात बँकेत संगणकाचा वापर सुरु झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना विना अडथळा संगणक वापरता येणे शक्य व्हावे म्हणून बँकेतील अधिकारी आणि इतर कर्मचारी वर्ग ह्यांच्यासाठी संगणक प्रशिक्षण सुरु करण्यासाठीचा एक आराखडा बनवण्याची सूचना करण्यात आली होती. त्यावेळी ट्रेनिंग कॉलेजमधील श्री. वैशंपायन वगळता इतर कोणत्याही अन्य कर्मचाऱ्याला संगणकाच्या संदर्भातील कोणतीही माहिती नसल्यामुळे ह्या पत्राला उत्तर देण्याची सर्व जबाबदारी प्राचार्यांनी त्यांच्यावर सोपवली होती. बँकेच्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेज मध्ये रुजू होण्याआधी श्री. वैशंपायन एका मोठ्या इंजिनिअरिंग कंपनीत काम करत होते आणि त्यावेळेस त्यांनी त्या कंपनीच्या व्यावसायिक विभागासाठी सॉफ्टवेअर कॉम्प्युटर प्रोग्रॅम्स बनवले होते तसेच त्याकाळात त्यांनी लिहिलेली एक केस स्टडी देशातील एका मान्यवर आणि अग्रगण्य व्यावसायिक नियतकालिकात छापून देखील आली होती.

श्री. वैशंपायन आणि इतर अन्य सहा जण ह्यांची ह्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेजवर वरिष्ठ प्राध्यापक पदी नियुक्ती करण्यात आली होती हे सर्वच सदस्य बँकिंग सोडून इतर अन्य क्षेत्रातील जाणकार असल्याने त्यांच्या नियुक्तीमुळे बँकेत विविध नवीन विचारांचे वारे वाहू लागतील आणि स्टाफ ट्रेनिंग कॉलेजची बँकेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी एक संस्था अशी सीमित ओळख पुसली जाईल व बँकेत काम करणाऱ्या वरिष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांसाठीची एक ख्यातनाम प्रशिक्षण संस्था म्हणून ही संस्था नावारूपास येईल अशी सर्वांनाच आशा वाटत होती. त्यानुसार त्यांनी अनेक नवीन उपक्रम उदा. ऑर्गनायझेशन अँड मेथड्स, मॅनेजमेन्ट इन्फर्मेशन सिस्टिम्स, मॅनेजिंग ऑर्गनायझेशनल चेंज अशा नवनवीन अभ्यासक्रमांची आखणी व आयोजन करायला सुरुवात केली. अशा प्रकारच्या कोणत्याही अभ्यासक्रमाचे आयोजन ह्या आधी कोणत्याही प्राध्यापकाने केलेले नव्हते. १९६९ सालच्या बँक राष्ट्रीयकरण मोहिमेत राष्ट्रीयकरण झालेल्या व्यावसायिक बँकांमध्ये ह्या बँकेचा क्रमांक दुसरा होता. त्यावेळी बँकेत साधारण शंभर एकजण मुख्य व्यवस्थापक/प्रादेशिक व्यवस्थापक तर साधारण तीन एकशे जण वरिष्ठ अधिकारी स्तरावर कार्यरत होते. त्याचप्रमाणे श्री. वैशंपायन ह्यांनी बँकेत पहिल्यांदाच अधिकारी पदावर काम करणाऱ्या व्यक्तींसाठी दोन आठवड्यांचा 'जनरल मॅनेजमेंट प्रोग्रॅम' हा अभिनव उपक्रम देखील आयोजित केला. ह्या उपक्रमाच्या अंतर्गत त्यांनी 'कॉम्प्युटर ऍप्रिसिएशन' नावाचा एक तीन तासांचा स्वतंत्र पाठ (मॉड्यूल) बनवला. परंतु ह्या आधीच्या प्राचार्यांनी मात्र, 'तुम्ही बँकेत संगणक हा शब्द वापरण्यास धजावलात तरी कसे?' असं म्हणत ह्या मॉड्यूलला आपला तीव्र विरोध दर्शवला होता. अर्थातच असा कोणताही विरोध त्याकाळात अनपेक्षित नव्हताच. अर्थात पूर्व प्राचार्यांची कायदा, कर्मचारी व्यवस्थापन आणि औद्योगिक संबंध ह्या क्षेत्रातील प्रदीर्घकालीन पार्श्वभूमी बघता

त्यांच्याकडून असा प्रतिसाद न आला असता तरच नवल. प्राचार्यांनी दाखवलेल्या ह्या विरोधामुळे श्री. वैशंपायन ह्यांच्या मनात नाराजीचा एक दुखरा सूर मात्र उमटून गेला. इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल अभियांत्रिकी, कॉस्ट अकाउंटिंग आणि मॅनेजमेंट क्षेत्रातला दांडगा अनुभव अशी समृद्ध पार्शवभूमी असलेल्या श्री. वैशंपायन ह्यांना एकूणातच जीवनाच्या विविध क्षेत्रात रस होता आणि त्यांच्या ठायी असलेलं कुतूहल त्यांना एखादी गोष्ट वेगळ्या प्रकारे करून बघण्यासाठी कायम उद्युक्त करत असे. एक दिवस ते सहजच कॉलेजमधल्या इलेक्ट्रिशियन सोबत एका खोलीत गेले. तिथे जाऊन बघतात तर काय तिथे दोन लांबच्या लांब सिमेंटचे कट्टे बांधलेले होते आणि त्यापैकी फक्त एकाच कट्ट्यावर एक मशीन ठेवलेलं होतं. त्याबाबत विचारपूस केली असता तो इलेक्ट्रिशियन त्यांना म्हणाला की, ' साहेब, ते मशीन हा सेंट्रलाइज्ड एअर कंडिशनरचा कॉम्प्रेसर असून पुढे भविष्यात गरज भासल्यास जास्तीचे एअर कंडिशनर्स घेतल्यास आणखी एक कॉम्प्रेसर बसवावा लागेल त्यासाठी हा कट्टा बांधून घेतला आहे. मग त्याला साधारण किती खर्च येईल असं त्याच इलेक्ट्रिशियनला त्यांनी विचारल्यावर तो ' तज्ञ ' इलेक्ट्रिशियन ताबडतोब म्हणाला की, ‘साहेब, त्यासाठी साधारणपणे दोन एक लाख रुपये लागतील’. असाच अजूनही एक प्रसंग घडला, त्यांच्या कार्यालयात काम करणारा एक सफाई कामगार रोज तळघरातल्या एका हॉलमध्ये ये जा करत असे. आणि श्री. वैशंपायन ह्यांना हा तिथे जाऊन नक्की काय काम करतो हे बघण्याची जाम उत्सुकता वाटत असे त्यामुळे ते एकदा त्याच्या मागोमाग तिथे गेले आणि बघतात तर काय त्या भल्या मोठ्या ३० * ६० फुटाच्या हॉलचा वापर केवळ रद्दी आणि तुटकं फुटकं सामान ठेवण्यासाठी केला जात होता. देशातल्या अ दर्जाच्या महानगरांपैकी एक म्हणून गणल्या जाणाऱ्या शहरातल्या एका उच्चभ्रू वस्तीत हे कार्यालय होतं जिथे एका स्क्वेअर फुटासाठी रु. १० प्रमाणे भाडे आकारले जात होते आणि त्या भल्या मोठ्या हॉलच्या भाड्यापोटी प्रति महिना रु. १८,०००/ प्रमाणे भाडे देण्यात येत होते. एका प्राचार्यांच्या पगाराच्या चारपट असणारी ही रक्कम केवळ कचरा कुंडी म्हणून वापरली जात असल्याचं श्री. वैशंपायन ह्यांना किती तरी काळ सखेद आश्चर्य वाटत राहिलं.

**पत्राचे उत्तर**

विभागाकडूनच ते पत्र आलेले असल्याने ते थोडेफार नाराज आणि वैतागलेलेच होते. कारण सुमारे वर्षभरापूर्वीच ह्याच विभागाच्या माजी प्राचार्य महाशयांनी साधा 'संगणक' हा शब्द सुद्धा अधिकाऱ्यांसाठीच्या अभ्यासक्रमात असण्यावर तीव्र आक्षेप घेतला होता इतकेच नव्हे तर ह्याच मुद्द्यावरून त्यांनी श्री. वैशंपायन ह्यांना चांगलेच फटकारले देखील होते. परंतु त्यांनी त्या पत्राला उत्तर देण्याचे ठरवले कारण सध्याचे नवीन प्राचार्य फार चांगले होते आणि त्यांनी श्री. वैशंपायन ह्यांना कधीच वाईट वागणूक दिलेली नव्हती उलटपक्षी त्यांनी त्यांच्या अनेक उपक्रमांना उदा. संशोधन कायमच सक्रिय पाठिंबा दिला होता.

**प्रस्ताव**

उत्तरादाखल श्री. वैशंपायन ह्यांनी संगणक प्रशिक्षणासाठी एक सविस्तर योजना बनवून पाठवली. एकीकडे मागील प्राचार्यांनी दिलेल्या अपमानास्पद वागणुकीला सडेतोड उत्तर दिले जावे आणि मनात असलेल्या वेगवेगळ्या कल्पनांना वावही मिळावा अशा दुहेरी भूमिकेतून त्यांनी हे उत्तर लिहिले होते. उत्तरादाखल लिहिलेल्या प्रस्तावात थोडक्यात खालील प्रशिक्षणाची माहिती दिलेली होती,

**१. हार्डवेअर मेंटेनन्स ट्रेनिंग:** बँकेची प्रादेशिक/झोनल कार्यालयं तसेच मुख्य कार्यालयांमध्ये उघडण्यात आलेल्या विविध संगणक केंद्रे चालवणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी ह्या ट्रेनिंगची आखणी करण्यात आली. संगणक सप्लायर्स / मेंटेनन्स एजन्सी ह्यांच्यातर्फे हे प्रशिक्षण देण्यात येणार होते.

**२. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ट्रेनिंग**: बँकेतील विविध ऍप्लिकेशन्ससाठी सॉफ्टवेअर विकसित करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी ह्या ट्रेनिंगची मांडणी करण्यात आली. TCS सारख्या कंपन्या आणि IIT, IIM ह्या सारख्या शैक्षणिक संस्थांद्वारे हे प्रशिक्षण देण्यात येणार होते.

**३. उपयोगकर्त्यांसाठीचे प्रशिक्षण (युजर ओरिएनटेड ट्रेनिंग)**

अ) हे प्रशिक्षण विभागीय आणि प्रादेशिक कार्यालयात काम करणाऱ्या कार्यकारी/ अधिकाऱ्यांसाठी (ज्या कार्यालयात हे संगणक बसवण्यात येणार आहेत त्याठिकाणी) तयार करण्यात आले आहे. जेणेकरून त्याच कार्यालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना संगणकाची ओळख होऊन हळूहळू त्याचा वापर करणे त्यांच्या अंगवळणी पडेल आणि मग जलद गतीने अधिक चांगले निर्णय घेण्यासाठी ते ह्या संगणकांचा वापर करू लागतील. मुख्य कार्यालयतील विभागीय आणि प्रादेशिक विभागात काम करणाऱ्या सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात येईल.

ब) प्रत्येक शाखेतून एक किंवा दोन अधिकारी/ कर्मचारी हे सातत्याने किंवा अधून मधून विभागीय उच्च अधिकाऱ्यांना माहिती देत असतात. पण जर त्यांना संगणक हातळण्याचा सराव नसेल तर माहिती देत असताना त्यांच्याकडून चुका होतील. कारण अशी माहिती योग्य फॉरमॅट मध्ये देणे अत्यंत आवश्यक आहे ज्यामुळे चुका होणार नाहीत आणि डेटा देखील योग्य पद्धतीनेच प्रोसेस केला जाईल.

उपरोक्त ३ (ब) ह्या मुद्द्यात नमूद केल्याप्रमाणे, बँकेच्या १२ विभागीय प्रशिक्षण केंद्रामध्ये स्टाफ ट्रेनिंग कॉलेजमधल्या प्राध्यापकांकडून अर्ध्या दिवसाचे प्रशिक्षण सत्र सुरु करण्याची सूचना ह्या प्रस्तावाद्वारे करण्यात आली. ह्या प्रशिक्षण सत्रात स्टाफ ट्रेनिंग कॉलेज तर्फे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि आवश्यक ते किट देण्यात येईल. प्रस्तावातील मुद्दा क्रमांक ३ (अ) मध्ये सूचित केल्यानुसार जवळपास १२०० माणसांना तीन दिवसांचे संगणकावर काम करण्याचे प्रत्यक्ष (हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग) देण्यात येईल, ह्या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांना कार्यालयात असणारे संगणक हाताळणे आणि त्यांचा वापर करण्यासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास मिळत जाईल.

एका अग्रगण्य मॅनेजमेंट संस्थेने तीन दिवसांचा एक 'कॉम्प्युटर ऍप्रिसिएशन प्रोग्रॅम' सुरु केला होता आणि त्यासाठी माणशी रु. ३०००/- अशी फी आकारण्यात येत होती. म्हणजे जर बँकेला आपल्या १००० कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण द्यायचे झाल्यास त्यांना फी पोटी साधारणपणे साडेतीन लाख खर्च करावा लागणार होता. तसेच संस्था प्रत्येक वर्षी एक किंवा दोन ह्याहून अधिक वेळा प्रशिक्षण देणार नाही आणि त्यात सुद्धा एकावेळी साधारणपणे वीस एक जणांनाच ते मिळेल (त्याकाळात अग्रगण्य मॅनेजमेंट संस्थांमध्ये प्रायोजित प्रशिक्षणाचा प्रघात फारसा नव्हता.) अशा प्रकारे, साधारणपणे १२०० माणसांना ट्रेनिंग देण्यासाठी साधारणपणे ७ ते १० वर्षांचा कालावधी लागेल. सगळ्या कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्यासाठी ह्याहून वेगळा मार्ग सुद्धा तेव्हा उपलब्ध नव्हता. त्यामुळेच ह्या प्रस्तावात कॉलेजात २० जण मावतील अशा कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटरची सोय करण्याची सूचना मांडण्यात आली. तसेच ह्या ट्रेनिंग सेंटरच्या उभारणीसाठी साधारणपणे सहा लाखाची तजवीज करण्याची सूचना देखील मांडण्यात आली. श्री. वैशंपायन ह्यांनी ह्या सूचनेला अनुमोदन दिले. तसेच कॉलेज मधील आणखी एका कर्मचाऱ्याने देखील ह्या मोहिमेत सहभागी होण्याची तयारी दर्शवली.

**मुख्य कार्यालयाकडून आलेला प्रतिसाद:**

मुख्य कार्यालयात कार्यरत असणाऱ्या श्री. वैशंपायन ह्यांच्या वरिष्ठांच्या पसंतीस त्यांनी मांडलेला प्रतिसाद सर्वसाधारणपणे उतरला होता परंतु प्रस्तावातील दोन मुद्दे मात्र त्यांना जरा खटकत होते. पहिला मुद्दा म्हणजे त्यांच्या मते हा उपक्रम राबवण्यासाठी जी रक्कम प्रस्तावात नमूद करण्यात आलेली होती ती बऱ्याच अंशी कमी

होती. मुख्य कार्यालयातील वरिष्ठांच्या मते हा खर्च साधारण दहा लाखांच्या घरात गेला असता आणि इतका खर्च करणे त्याकाळात आवाक्याबाहेरचे होते. त्यामुळे त्यांनी ह्या मुद्द्यावर श्री. वैशंपायन ह्यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले. श्री. वैशंपायन हे सुद्धा आपल्या मुद्द्यावर अडून बसले आणि त्यांनी उलट टपाली मुख्य कार्यालयाला कळवले की त्यांनी नमूद केलेला खर्चाचा आकडाच योग्य होता. ह्यावर मुख्य कार्यालयाकडून त्यांना विचारणा करण्यात आली की बांधकामाचा आणि विजेचा खर्च न पकडता ह्या संगणक केंद्राच्या एकूण खर्चाची रक्कम कशी काय ठरवली गेली? उत्तरादाखल श्री. वैशंपायन ह्यांनी लिहिलं की जर मुख्य कार्यालयाने प्रशिक्षण केंद्र सुरु करायला हिरवा कंदील दाखवला तर ते सगळे तपशील मुख्य कार्यालयात सादर करतील. काही महिन्यांच्या अवधीनंतर मुख्य कार्यालयाकडून होकार आला आणि त्यानंतर त्यांनी ह्या प्रशिक्षण केंद्रासंदर्भातील सगळे तपशील मिळवण्यासाठी ह्या प्रकल्पावर अन्य दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली.

संगणकाच्या किमती व्यतिरिक्त इतर अन्य कोणत्याही वस्तूसाठी फारसा खर्च न करता संगणक केंद्र कॉलेजमधील वाचनालयातच सुरु करता येईल असा प्रस्ताव श्री. वैशंपायन ह्यांनी मांडला. (त्यावेळी 10 PC XTs, जे भारतीय बाजपरपेठेत दाखल झाले होते.) ह्यासाठी वाचनालय तळघरातील वापरात नसलेल्या मोठ्या हॉलमध्ये (जो सध्याच्या लायब्ररी पेक्षा जवळपास दुपटीने मोठा आहे) हलवण्यात येईल असे ठरवण्यात आले. आणि त्याकरता ए. सी. डक्टिंगचे काम आणि इलेक्ट्रिकल रूममध्ये दुसरा कॉम्प्रेसर बसवण्याचे काम करून घ्यावे लागेल असा प्रस्ताव मांडण्यात आला. कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाने ह्या कामाचा ग्रंथपालांकडे सतत पाठपुरावा केला कारण कर्मचारी वर्ग देखील केवळ एकच ए.सी. असल्याने खूप त्रस्त होता.

**मुख्य कार्यालयाकडून मिळालेली मंजुरी**

मुख्य कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आजवर वापरात नसलेली पडीक जागा वापरात येऊ शकते आणि त्या जागेत प्रशिक्षण केंद्र ते देखील इतक्या कमी किमतीत सुरु होऊ शकते ह्या गोष्टीचा सुखद धक्का बसला होता. सुरुवातीच्या दिवसात तिथे वाहनतळ सुरु करण्याचे घाटत होते परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे तसे होऊ शकले नाही. परंतु, पायाभरणीचे काम आणि कॉलम बांधून झाले असल्याने त्या जागेवर छत बांधून तिथे एक खोली बांधण्यात आली. मुख्य कार्यालयाने हा प्रस्ताव ताबडतोब मंजूर करून टाकला आणि अशा रितीने बँकिंग क्षेत्रातील पहिले संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु झाले.

पुढे मग बँकिंग क्षेत्रातील संगणकीकरण ह्या विषयावर गठीत केलेल्या मुख्य कार्यालयीन समितीवर श्री. वैशंपायन ह्यांची नियुक्ती करण्यात आली. आणखी काही वर्षांनंतर ह्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेजने अन्य बँकांतल्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सुद्धा प्रशिक्षण केंद्र सुरु केले आणि अशा रितीने ट्रेनिंग कॉलेजला स्वतःचे उत्पन्न देखील मिळू लागले.

परंतु, प्रशिक्षण केंद्रात शिकवणाऱ्या श्री. वैशंपायन ह्यांच्या काही सहकाऱ्यांच्या मते मात्र त्यांनी मुख्य कार्यालयातील वरिष्ठांची दिशाभूल करून हे प्रशिक्षण केंद्र सुरु केले होते. तर इतर काही जणांच्या मते ही एक व्यावसायिक सुसंधी होती. कर्मचारी व्यवस्थापन हा विषय शिकवणाऱ्या काही प्राध्यापकांनी ह्या प्रशिक्षण केंद्राला विरोध दर्शविला कारण त्यांच्या मते ह्या उपक्रमामुळे कामगारांच्या समस्या उदभवल्या होत्या. सर्वात आधी ह्या प्रशिक्षण केंद्रात संगणकावर टायपिंगची कामं सुरु करण्यात आली आणि मग हळूहळू कर्मचाऱ्यांना संगणक हाताळण्याचा सराव झाल्यानंतर सचिव पातळीवरील काही कर्मचाऱ्यांनी हे काम शिकून घेतले. त्यानंतर मग ते इतर ॲप्लिकेशन्स पण शिकू लागले.